# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धुळे विभाग धुळे

# मागणीपत्र / जाहिरात

विभाग नियंत्रक, रा.प.धुळे दर्शविलेल्या पदासाठी फक्त अनुसूचित जमातीचे उमेदवारांकडून "चालक तथा वाहक या पदाचे प्रशिक्षणार्थी म्हणून शहादा आदिवासी वाहन चालक प्रशिक्षण केंद्र, रा.प.धुळे विभागासाठी प्रतीक्षा यादीकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षण कालावधी इत्यादी बाबतीचा सेवा शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | पदाचे नांव | : चालक तथा वाहक (प्रशिक्षणार्थी) (प्रतीक्षा यादीकरिता) |
| २) | जागा | : ५० (मात्र पन्नास) फक्त अनुसूचित जमातीचे उमेदवारांसाठी |
| ३) | प्रशिक्षण कालावधी | : ०६ (सहा) महिने |
| ४) | विद्यावेतन | : रुपये ४५०/- दरमहा |
| ५) | शैक्षणिक अर्हता | : इयत्ता १० वी (दहावी/एस.एस.सी.) पास असणे आवश्यक. |
| ६) | वयोमर्यादा | : उमेदवारांचे वय कमीत कमी २१ वर्षे व जास्तीत जास्त ४३ वर्षे |
| ७) | शारीरिक पात्रता (उंची) | : कमीत कमी १६० सें.मी. व जास्तीत जास्त १८० सें.मी. |
| ८) | दृष्टी | : चष्मा विरहीत ६/६ निर्दोष दृष्टी (रंग आंधळेपणा किंवा रातांधळेपणा हा दोष असल्यास अपात्र ) |
| ९) | वाहन चालविण्याचा परवाना | : परिवहन अधिकारी यांचेकडील अवजड वाहन चालविण्याचा नियमित अथवा शिकाऊ परवाना अथवा १ वर्षांचे हलके मोटार वाहन चालविण्याचा वाहतूक परवाना आवश्यक आहे.. |

## -: उमेदवारांकरीता महत्त्वाच्या सूचना :-

१. जाहिरातीतील पदसंख्येत बदल करण्याचा अथवा जाहिरात रद्द करण्याचा अधिकार रा.प. महामंडळास राहिल.

२. अर्जातील संपूर्ण माहिती खरी व अचूक भरणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांची निवड रा.प. महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार रिक्त जागा व आरक्षण विचारात घेऊन करण्यात येईल. तसेच रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येईल.

४. अर्ज विहीत नमुन्यात सर्व दृष्टीने पूर्ण असावा. (अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे) अपूर्ण माहिती दिली असल्यास किंवा आवश्यक ते प्रमाणीत दाखले जोडले नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

५. अलीकडच्या काळात काढलेले पासपोर्ट आकारातील स्वतःचे छायाचित्र स्व-स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

६. पत्र व्यवहाराचा पत्ता आणि कायमस्वरूपी पत्ता सुस्पष्ट व पोष्टाचा पिनकोडसह व्यवस्थित वाचता येईल, असा लिहावा..

७. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हता पासची गुणपत्रिका, वाहन चालविण्याचा परवाना, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या दाखल्याच्या साक्षांकित प्रती स्पष्ट दिसतील अशा स्वरुपात जोडणे आवश्यक आहे.

८. उमेदवारांने समक्ष अथवा योग्य त्या साधानाद्वारे (टपालाने) अर्ज पाठवावा. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहीत मुदतीत प्राप्त होतील अशा बेताने पाठविण्यात यावे. टपाल खात्यामुळे अर्ज वेळेत प्राप्त न झाल्यास त्यांस रा.प. महामंडळ जबाबदार राहणार नाही.

९. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती प्रमाणपत्र / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी कुठलीही पूर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

१०. उमेदवाराने भरती प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये २५०/- मात्र एम. एस. आर. टी. सी. फंड अंकाऊन्ट, धुळे या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (डिमांड ड्रॉप्ट)/ पोस्टल ऑर्डर अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. भरती प्रक्रिया शुल्क इतर कोणत्याही स्वरुपात स्विकारले जाणार नाही. मागणी धनाकर्ष (डिमांड ड्रॉप्ट) चा मागे उमेदवाराने त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक लिहीणे आवश्यक आहे. उमेदवारांने पाठविलेले भरती प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

**११. अंतिम निवड करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना त्यांचे जमातीचे वैधता प्रमाणपत्र तसेच वाहकाचा परवाना व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नेमणूक देण्यात येईल.**

१२. रा.प. महामंडळ धुळे विभागाने कोणत्याही इतर व्यक्तीला अथवा संस्थेला अर्ज विकणे/स्विकारणे इ. अधिकार दिलेले नाहीत यांची नोंद घ्यावी.

१३. एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केला किंवा त्यांच्या व्यक्तीचा माध्यमातुन अनुचित प्रकार चुकीचे/खोटे दस्ताऐवज सादर केल्याचे आढळून आल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियाच्या कोणत्याही टप्प्यातून अथवा निवडीतून अपात्र घोषित करण्यात येईल.

१४. कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता नाकारणे वा स्वीकारणे किंवा सदर जाहिरात पूर्णतः वा अशंत: रद्द करण्याचे अधिकार रा.प. महामंडळ राखून ठेवीत आहे.

१५. निवड झालेल्या उमेदवारास यशस्वी प्रशिक्षणाअंती परिस्थीतीनुसार तसेच रा.प. महामंडळाच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्यात कोणत्याही विभागात नेमणुक देण्यात येईल.

१६. अर्ज स्विकारण्याची अंतीम मुदत दिनांक २३.१०.२०२३ (सोमवार) १७:०० पर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थीतीत स्विकारले जाणार नाहीत. तसेच पोस्टाने किंवा तत्सम माध्यमाने झालेल्या विलंबाची जबाबदारी रा.प. महामंडळाची राहणार नाही, यांची नोंद घ्यावी.

१७. सदर योजनेअंतर्गत वेळोवेळी ठरणाऱ्या धोरणात्मक बाबीनुसार "चालक तथा वाहक" (क) या पदी आपली निवड होईलच याची हमी रा.प. महामंडळ देत नाही.

१८. अंतीम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना विद्यावेतन अदा करण्यासाठी त्यांचा नावे असलेले **राष्ट्रीयकृत बँकेचे (स्टेट बँक ऑफ इंडिया)** पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत सादर करावी लागेल. तद्नंतरच त्यांचा बँक खात्यात प्रत्यक्ष हजर दिवसानुसार विद्यावेतन अदा करण्यात येईल.

१९. अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना स्वखर्चाने गणवेश घ्यावा लागेल (फुल खाकी पॅन्ट व शर्ट)

**२०. सदर जाहिरातीस म.रा.मा.प. महामंडळाच्या सरळसेवा भरती धोरणानुसार सर्व नियम, अटी व शर्ती लागू राहतील.**

२१. जाहिराती सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील छापील अर्जातच अर्ज सादर करण्यात यावा. इतर नमुन्यातील अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

**सही/-**
**विभाग नियंत्रक**

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धुळे विभाग धुळे
# "चालक तथा वाहक" प्रशिक्षणार्थी पदासाठी अर्ज

(अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्हतेप्रमाणे लागू असले तेवढीच माहिती भरावयाची आहे. तसेच जेथे दाखला जोडावा असे नमूद केलेले आहे तेथे मूळ दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकित प्रत जोडावी)

प्रति,
मा. विभाग नियंत्रक, म.रा. मा.प. महामंडळ,
विभागीय कार्यालय, दक्षता पेट्रोल पंप समोर,
पालेशा कॅालेज जवळ, संतोषी माता मंदिर रोड,
धुळे ता.जि.धुळे : ४२४ ००१

अलीकडील पासपोर्ट साईजचा स्वत:चा फोटो चिकटवून सही करणे

## माझी माहिती मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | तपशील | उमेदवाराची माहिती |
|---|---|---|
| १ | उमेदवारांचे संपूर्ण नाव (प्रथम आडनाव) | श्री/श्रीमती/कुमारी |
| २ | वैवाहिक स्थिती (विवाहित / अविवाहित) | |
| ३ | वडिलांचे संपूर्ण नाव (प्रथम आडनाव) | |
| ४ | अ) उमेदवारांचा सध्याचा संपूर्ण पत्ता (पत्रव्यवहारासाठी पिनकोड क्रमांकासह) | |
| | ब) उमेदवारांचा मोबाईल क्रमांक | |

| | | |
|---|---|---|
| | ब) उमेदवाराचा मोबाईल क्रमांक | |
| | क) उमेदवारांचा कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता (कार्यालयीन दप्तरासाठी पिनकोड क्रमांकासह) | |
| ५) | जन्मतारीख (शाळा सोडल्याचा दाखला जोडावा) | |
| ६) | अ) उमेदवारांचा जातीचा प्रवर्ग मागास / अमागास | |
| | ब) मागासवर्गीयांच्या बाबतीत उमेदवाराची जात (जातीचा दाखला जोडावा) अनु. जमात/पोटजात | |
| ७) | जमातीचे वैधता प्रमाणपत्र (वैधता दाखला जोडावा) आहे / नाही | |
| ८) | उमेदवाराची मातृभाषा | |

**९) शालेय, महाविद्यालयीन व इतर शिक्षणाचा तपशील १० वी पासून पुढे (सोबत प्रमाणित दाखले जोडावे)**

| अ.क्र. | शाळेचे / महाविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण परीक्षा व वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६ | | | | | | |

**१०) भरती प्रक्रिया शुल्काचा तपशील**

| अ.क्र. | बँकेचे / पोस्टाचे नाव | कोणाच्या नावे काढला (तपशील) | धनाकर्ष क्र. / पोस्टल ऑर्डर क्र. व दिनांक | रक्कम / रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

**११) पूर्वीच्या नोकरीतील अनुभवाचा तपशील ("चालक तथा वाहक" (क) पदासाठी अर्ज करणाऱ्या ऊमेदवारांनी मालकाच्या नावासोबत त्यांच्या पत्ता, दुरध्वनी क्रमांक, चालविलेल्या वाहनाचा प्रकार व नोंदणी क्रमांक, अनुभवाचा कालावधी पासून ते पर्यंत या दोन्ही तारखासह इतर बाबींचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. सोबत दाखला जोडावा)**

| अ.क्र. | नियोक्त्याचे नाव | धारण केलेले पद | नोकरीचा कालावधी | | वेतन | नोकरी सोडल्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |